# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.04.2025** **वारःमंगळवार**

---

•रिझर्व बँकेच्या ९०व्या वर्षपूर्ती सोहळ्याची राष्ट्रपतींच्या उपस्थितीत आज सांगता
•वक्फ सुधारणा विधेयकावर चर्चा करण्यासाठी सर्वपक्षांनी सहकार्य करण्याचं अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजीजू यांचं आवाहन
•चीलीचे राष्ट्राध्यक्ष गेब्रिएल बोरिक फॉन्ट भारत दौऱ्यावर
•मध्यप्रदेशात आजपासून १९ शहरी आणि ग्रामीण भागांत संपूर्ण दारुबंदी लागू
•यंदा एप्रिल ते जून या कालावधीत तापमानाचा पारा नेहमीपेक्षा जास्त चढता राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज मुंबई दौऱ्यावर आहेत. काल संध्याकाळी त्यांचं मुंबईत आगमन झालं. राज्यपाल सी पी राधाकृष्णन आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचं विमानतळावर स्वागत केलं. आज भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९०व्या वर्षपूर्ती सोहळ्याच्या समारोप समारंभाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ९० व्या वर्षपूर्तीनिमित्त गेले वर्षभर रिझर्व्ह बँकेनं देशभरातील नागरिकांसाठी आर्थिक साक्षरतेबाबतचे विविध उपक्रम आयोजित केले होते.

**<u>रिजिजूवक्फ</u>**

वक्फ सुधारणा विधेयक जेव्हा संसदेत येईल तेव्हा त्यावर होणाऱ्या सविस्तर चर्चेत सहभागी व्हावं असं आवाहन केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी सर्व राजकीय पक्षांना केलं आहे. हे विधेयक तयार झालं आहे, मात्र काही नेते त्याबाबत दिशाभूल करणारी चुकीची माहिती पसरवत आहेत, ही गोष्ट समाजासाठी आणि देशासाठी अत्यंत हानिकारक आहे, असं रिजिजू यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेला संबोधित करताना सांगितलं. अशा पद्धतीनं निर्दोष लोकांची दिशाभूल करणं ही निषेधार्ह बाब आहे. वक्फ विधेयकाबाबत संयुक्त संसदीय समितीकडून संबंधित प्रत्येक घटकाशी तपशीलवार सल्लामसलत करण्यात आली आहे, असंही रिजिजू यांनी नमूद केलं.

**<u>चीली-राष्ट्राध्यक्ष</u>**

चीलीचे राष्ट्राध्यक्ष गेब्रिएल बोरिक फॉन्ट आजपासून पाच दिवसांच्या भारत भेटीवर आहेत. त्यांच्या बरोबर उच्चस्तरीय शिष्टमंडळही आहे; त्यामध्ये चिलीचे मंत्री, व्यावसायिक संघटनांचे प्रतिनिधी तसंच भारत आणि चिली दरम्यान सांस्कृतिक सहकार्यासाठी काम करणाऱ्या सदस्यांचा समावेश आहे. चिलीच्या राष्ट्राध्यक्षांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. ते आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. तसंच राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांचीही ते भेट घेणार आहेत. त्यांच्या सन्मानार्थ राष्ट्रपती भवन इथं मेजवानीचं आयोजन करण्यात आलं आहे. या दौऱ्या दरम्यान फॉन्ट आग्रा, मुंबई आणि बेंगलुरु या शहरांनाही भेट देणार आहेत. यावेळी ते राजकीय नेते, व्यावसायिक, औद्योगिक प्रतिनिधींची भेट घेणार असून विविध क्षेत्रातील स्टार्टअप्स आणि नवोन्मेषासाठी काम करणाऱ्या प्रतिनिधींशी चर्चा करणार आहेत. गेल्यावर्षी भारत आणि चिली दरम्यानचा द्विपक्षीय व्यापार एकंदर अडीच अब्ज अमेरिकन डॉलर्सचा होता. सध्या चिलीमध्ये भारतीय गुंतवणूक सुमारे ६२० दशलक्ष अमेरिकन डॉलर्स इतकी आहे.

**<u>एस-जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ एस जयशंकर यांनी नेदरलँडचे परराष्ट्र मंत्री कॅसफर वेल्दकॅम यांची काल नवी दिल्ली इथं भेट घेतली. यावेळी दोनही देशांदरम्यानचा द्विपक्षीय व्यापार, गुंतवणूक, संशोधन, पाणी, कृषी, आरोग्य, संरक्षण अशा विविध मुद्यावर चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी समाजमाध्यामावरील संदेशांत म्हटलं आहे. भविष्यात सेमीकंडक्टर्स, हरितउर्जा, शिक्षण आणि प्रतिभावंतांची देवाणघेवाण या विषयावर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. वेल्दकॅम यांचं दोन दिवसांच्या भारत दौऱ्यासाठी काल आगमन झालं.

**<u>मध्य-प्रदेश</u>**

मध्य प्रदेशात, उज्जैन, ओंकारेश्वर, महेश्वर आणि मैहर यासारख्या निवडक ग्रामपंचायतींअंतर्गत येणाऱ्या ठिकाणांसह १९ धार्मिक शहरांमध्ये तसंच इतर परिसरांत आजपासून दारूबंदी लागू होत आहे. उज्जैन, ओंकारेश्वर, महेश्वर, मंडलेश्वर, ओरछा, मैहर, चित्रकूट, दतिया, पन्ना, मंडला, मुलताई, मंदसौर आणि अमरकंटक या शहरी हद्दीतील सर्व दारूची दुकाने आणि बार बंद करण्यात आल्याची माहिती एका सरकारी अधिकाऱ्यांनी दिली.

**<u>म्यांमाभूकंप</u>**

म्यांमामध्ये गेल्या आठवड्यात, झालेल्या विनाशकारी भूकंपात बळी पडलेल्यांची संख्या दोन हजारांच्या वर गेली आहे. म्यांमाच्या मंडाले भागाला शुक्रवारी अगोदर ७ पूर्णांक ७ रिख्टर आणि त्यापाठोपाठ काही मिनिटांनी ६ पूर्णांक ४ एवढ्या मोठ्या क्षमतेच्या भूकंपाचे धक्के बसल्यानं म्यांमासह आसपासच्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली आहे. देशात भूकंपात मरण पावलेल्यांची संख्या आता २ हजार ५६ झाली असून ३ हजार ९०० च्या वर नागरिक जखमी झाले आहेत.

तर जवळपास २७० व्यक्ती अद्याप बेपत्ता आहेत, असं म्यांमाच्या लष्करी नेतृत्वाच्या वतीनं सांगण्यात आलं. दरम्यान या प्रचंड जीवितहानीमुळं सरकारनं ७- दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. दरम्यान संपूर्ण देशभर बचाव कार्य वेगात सुरू आहे. भारत, रशिया, अमेरिका, संयुक्त राष्ट्रे आणि युएईसह

अनेक ठिकाणहून मदत पथकं देशात दाखल झाली असून त्यांनी मोठ्या प्रमाणात मानवतावादी मदतही पाठवली आहे.

दरम्यान ब्रम्हा मोहिमेअंतर्गत ५० टन मदत आणि बचाव सामग्री घेऊन जाणारी भारतीय नौदलाची सातपुडा आणि सावित्री ही जहाजं काल यांगून इथं दाखल झाली. भारतीय हवाई दलाची सहा विमाने आणि पाच भारतीय नौदलाच्या जहाजांसह, भारताची मदत यांगून, नायपिताव आणि मंडाले येथे पोहोचवण्यात आली आहे. अशी माहिती यांगूनमधील भारतीय दूतावासानं समाजमाध्यमांद्वारे दिली आहे

**<u>तस्करी</u>**

दिल्ली-एनसीआर भागात अमली पदार्थांची तस्करी करणारी टोळी पकडण्यात आल्याची माहिती गृहमंत्री अमित शहा यांनी समाज माध्यमावरील संदेशांत दिली आहे. अमली पदार्थ नियंत्रण मंडळ अर्थात NCB आणि दिल्ली पोलीसांनी केलेल्या संयुक्त कारवाईत एकंदर २७ कोटी रुपये अमली पदार्थ सापडले आहेत. या कारवाईत मूळचे नायजेरियाचे असलेल्या ४ नागरिकांसह पाच जणांना अटक करण्यात आली आहे.

**<u>युरोपिअन</u>**

युरोपिअन निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी फ्रांसच्या न्यायालयानं मरिन ले पेन यांना कारावासाची शिक्षा सुनावली आहे तसंच कोणत्याही प्रशासकीय सेवेत सहभागी न होण्याची ताकीद दिली आहे. युरोपिअन संसदेच्या सदस्या असलेल्या  ले पेन यांनी सुमारे ३ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स चा वापर आपल्या नॅशनल रॅली पक्षाच्या सदस्यांसाठी केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.
सध्या फ्रेंच संसदेच्या सदस्या असलेल्या ले पेन यांना त्यांच्या पक्षातील त्या वेळी युरोपियन संसदेचे सदस्य असलेल्या आठ जणांसह दोषी ठरवण्यात आलं आहे.

**<u>ट्रंप</u>**

अमेरिकेच्या जहाजांसाठी धोका असलेल्या येमेनमधील हुथी बंडखोरांची बंडखोरी थोपवण्यासाठी अमेरिकेचे हल्ले सुरू राहतील असा इशारा  अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत दिला आहे. गेल्या दोन आठवड्यांतील सतत सुरु असलेल्या हल्ल्यांमुळे इराण समर्थित हुथी दहशतवाद्यांना रोखण्यात अमेरिकेला यश आलं आहे.  असं ट्रंप यांनी म्हटलं आहे. अमेरिकेने १५ मार्च रोजी प्रमुख सागरी मार्गांवर केमेरीन बेटानजिक अमेरिकी जहाजांना धमकावण्यासाठी हुथी बंडखोरांनी हल्ले केले. याला प्रत्युत्तरादाखल केलेल्या हल्ल्यात वरिष्ठ हुथी नेत्यांना ठार मारलं असल्याची माहिती अमेरिकन अधिकाऱ्यांनी दिली होती, तर ५३ लोक मारले गेल्याचं बंडखोरांच्या आरोग्य मंत्रालयानं सांगितलं. तेव्हापासून, बंडखोरांनी अमेरिकन लष्करी जहाजे आणि इस्रायलला लक्ष्य करणार असल्याची घोषणा केली आहे.

**<u>हॉकीआशियाकप</u>**

यावर्षी ऑगस्ट मध्ये बिहारमधील राजगिर इथं हिरो आशिया चषक हॉकी स्पर्धेचं आयोजन करण्यात येणार आहे. या संदर्भात हॉकी इंडिया आणि बिहार राज्य क्रीडा प्राधिकरण यांच्यात पाटणा इथं सामंजस्य करार करण्यात आला. अलीकडेच बांधण्यात आलेल्या राजगिर हॉकी स्टेडियममध्ये २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत ही स्पर्धा पार पडेल. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये महिला आशियाई विजेतेपद स्पर्धेनंतर राजगिर इथं आयोजित केली जाणारी ही दुसरी आंतरराष्ट्रीय स्पर्धा असेल. १२ व्या हिरो आशिया चषक स्पर्धेत भारत, पाकिस्तान, जपान, कोरिया, चीन आणि मलेशियासह एकंदर ८ संघ सहभागी असतील,

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल मुंबई इंडियन्स संघानं कोलकाता नाईटरायडर्स संघावर आठ गडी राखून विजय मिळवला. मुंबईत वानखेडे मैदानावर झालेल्या या सामन्यात मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. आणि कोलकाता नाइट रायडर्स संघाला 17 व्या षटकात ११६ धावांवर सर्वबाद केलं. 117 धावांच हे लक्ष्य मुंबईने केवळ दोन गड्याच्या मोबदल्यात १3व्या षटकातच पूर्ण केल. रायन रुकेलटन यांनं ४१ चेंडूत ६२ धावा तर सुर्यकुमार यादवनं ९ चेंडूत २७ धावा करत विजयी भागिदारी केली. आज लखनौ सुपर जायंडटसचा सामना पंजाब किंग्जबरोबर लखनौ इथं खेळाला जाईल.

**<u>हवामान</u>**

यंदा एप्रिल ते जून या कालावधीत देशातील बहुतेक भागात सरासरीपेक्षा जास्त कमाल तापमान राहण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे.

या कालावधीत बहुतांश भागांत किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील, असं हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी काल सांगितले. एप्रिल ते जून या कालावधीत उत्तर आणि पूर्व भारत, मध्य भारत आणि वायव्य भारतातील बहुतेक भागांमध्ये सामान्यपेक्षा दोन ते चार अंस सेल्सिअस जास्त राहील. त्यामुळे नागरिकांना उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागू शकतो असा इशारा त्यांनी दिला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार